प्रकरण दुसरे

# राष्ट्रीय कविता आणि कुंजविहारी



# प्रकरण दुसरे

## मराठीतील राष्ट्रीय कविता आणि कुंजविहारी

१) प्रस्तावना

२) राष्ट्र, राष्ट्रवाद संकल्पना

३) राष्ट्रीय कवी, राष्ट्रीय कविता

४) राष्ट्रीय कवितेचा उगम इंग्रजी वाङ्.मयात की राष्ट्रप्रेमात

५) मध्ययुगीन काव्यातून आढळणारी देशभक्तीची भावना

६) संतानी राष्ट्रीय कार्य बजावले

७) शाहीरांच्या कवितेतील राष्ट्रीय भावना

८) राष्ट्रीय कवितेची प्रेरणा व व्याप्ती

९) राष्ट्रीय चळवळीचा मराठी साहित्य व काव्यावर परिणाम

१०) मराठी राष्ट्रीय कवितेचा विकास

 १) पूर्वस्मृतीचा कालखंड

 २) राष्ट्रीय जागृतीचा कालखंड

 ३) राष्ट्रीय कवितेचे सुवर्णयुग

 ४) राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा कालखंड

 ५) संमिश्र वैचारिक प्रभावाचा कालखंड

११) मराठी राष्ट्रीय काव्याची वैशिष्ट्ये

१२) कवी कुंजविहारी यांचे वेगळेपण व महत्त्व

१३) संदर्भसूची

# प्रकरण दुसरे

## १) प्रस्तावना -

राष्ट्रीय कवी कुंजविहारी आणि मराठी राष्ट्रीय काव्याचा अभ्यास करत असता राष्ट्र, राष्ट्रवाद या संकल्पनाही पाहणे क्रमप्राप्त ठरते. तसेच मराठी काव्यात दिसून येणारी राष्ट्रीय भावना ही मूळची भारतीय, महाराष्ट्रीय की पाश्चात्यांच्या शिकवणुकीतून किंवा वाङ्.मयातून / राष्ट्रवादातून आली आहे. हे पडताळून पाहणे महत्त्वाचे आहे. एकूणच राष्ट्रीय काव्य निर्माण होण्यास कोणत्या प्रेरणा पोषक ठरल्या, राष्ट्रीय काव्याची व्याप्ती कशी आहे, तिचा विकास कसा होत गेला; हे पाहणे आवश्यक आहे. मराठी राष्ट्रीय कविता वेगवेगळ्या कालखंडात कशी बदलत गेली हेही पाहवयास मिळते. हा राष्ट्रीय काव्याचा आढावा घेत असताना कवी कुंजविहारींचे राष्ट्रीय काव्यातले योगदाने कोणते व त्यांचे स्थान काय? हे सुध्दा ओघाने येते. अशा प्रकारे आपण दुसऱ्या प्रकरणात मराठी राष्ट्रीय काव्याचा इतिहास पाहणार आहोत. 'राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता' (डॉ.ज.धु.नाईकवाडी) या ग्रंथाच्या आधारे त्याचा आढावा घेऊ.

## २) राष्ट्र, राष्ट्रवाद संकल्पना -

राष्ट्र या शब्दाचा अर्थ काय ? तो केव्हा अस्तित्वात आला ? राष्ट्रवाद म्हणजे काय ? त्याचा उदय कसा झाला याविषयी चर्चा करणार आहोत.

### राष्ट्र -

फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात आणि पोलंड विभाजनाच्या वेळी प्रथमच 'राष्ट्र' हा शब्द उपयोगात आला. 'राष्ट्र' म्हणजे जनतेतील जाणीवयुक्त कार्यशील अंश

असे मानले गेले.[१] इंग्रजी भाषेतील 'नेशन' (Nation) या शब्दाची व्युत्पत्ती पाहिली तर तीत 'राष्ट्र' या शब्दांचा आधुनिक अर्थ ग्रथित झाल्याचे दिसून येत नाही.(Nation) या शब्दाचे मूळचे नेशिवो 'Natio' या लॅटिन शब्दात असून त्याचा अर्थ ट्राईब (Tribe) जन्म अथा वंश असा आहे वेबस्टरच्या विशाल शब्द कोशात 'नेशन' या शब्दाचे पुढील अर्थ दिलेले आहेत. कम्युनिटी कास्ट, क्लास किंवा व्यवसायाने व हितसंबधाने निर्माण झालेला वंश, वर्ग, देश, रक्ताचे नाते असलेले लोक किंवा भाषा धर्मपरंपरा यांनी परस्परांशी संबंधित लोकसंस्था परंपरा आणि सामाजिक ऐव्य असलेला मानवी समुदाय असे भिन्नभिन्न अर्थ दिलेले आहेत.[२] या सर्व अर्थातून नेमका अर्थ कोणता स्वीकारावा ? कारण 'राष्ट्र' या शब्दासाठी दिलेल्या अर्थात 'राष्ट्रीयत्व' या शब्दाच्या अर्थाचीही गुंतागुंत झालेली दिसते.

'दि मिनिंग ऑफ नॅशनालिझम' या ग्रंथाचा कर्ता लुईस एल स्नॉयडर यांच्यामते "इतिहासाच्या प्रवाहात राष्ट्रभावनेचा अर्थ सतत बदलत गेला." त्यामुळे एकाच संज्ञेचे विविध अर्थ सांगण्यात येऊ लागले. म्हणूनच रॅम्यसेमूर, हर्बट, बर्नार्ड आदी पंडितांनी अशी कबुली दिली की, 'राष्ट्र' या शब्दाची निश्चित व्याख्या करणे दुसाध्यच आहे. म्हणूनच 'राष्ट्र' या शब्दाची विविध लक्षणे पाहूया. वंश, भाषा, देश, धर्म, संस्कृती, इतिहास परंपरा शिक्षण साहित्य, राजकीय व आर्थिक हितैक्यता इत्यादी लक्षणे प्रमुख मानलेली आहेत.

**व्याख्या -**

१) सुप्रसिध्द इतिहासकार अर्नेस्ट वॉकर राष्ट्राची सर्वसमावशक व्याख्या करताना म्हणतात - 'राष्ट्र' म्हणजे असा लोकसमूह की, जो अनेक वंशाचा बनलेला असून ज्याच्या जवळ इतिहासाच्या कालौघात प्राप्त झालेला भावनांचा व विचारांचा सर्वसामान्य ठेवा

असून जो एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव्य करतो.''[३]

२) जर्मन राज्यशास्त्रज्ञ प्रॉन्सिस लॉयबर - ''भटक्या अवस्थेतून बाहेर पडलेला, सातत्याने एका सलग सीमाबध्द निश्चित तसेच विशिष्ट नामांकित भू-प्रदेशात वास्तव्य करणारा त्या भूभागाकरिता श्रमणारा स्वतःची भाषा असणारा त्याभाषेतून साहित्यनिर्मिती करणारा किमान लोकसंख्या असणारा, त्याभूभागाकरिता इतर समाजाहून भिन्न अशा सामान्य संस्था असलेला समान भविष्यासंबंधी सामान्य आकांक्षा बाळगणारा विशिष्ट सजीवतेने युक्त, बौध्दिक पण इतर जनसमूहापासून वेगळा असा एकाजिनसी लोकसमूह म्हणजे राष्ट्र होय.''[४]

३) बिपीनचंद्रपाल - 'राष्ट्र' ही एक आध्यात्मिक आणि नैतिक सजीवता मानल्यास तिची अभिव्यन्ती सातत्याने ऐतिहासिक स्मृती आणि भावी उद्दिष्टे यांच्याद्वारे होते हेही मान्य करावे लागते.''[५]

४) स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर - ''आम्ही हिंदू हे स्वयंमेव राष्ट्र आहोत. कारण धार्मिक, वांशिक, सांस्कृतिक ऐतिहासिक अशा साऱ्या आप्तबंधनांनी आम्ही एकात्म एक राष्ट्र बनलो असून त्यांच्या जोडीला प्रादेशिक एकतेचीही देणगी आम्हाला नित्याची लाभली आहे. आमचे वांशिक अस्तित्त्व हिंदुस्थानशी आमच्या प्रिय अशा पितृभूमीशी नि पुण्यभूशी - एकरूपता पावलेले आहे. पण या सर्वाहूनही महत्त्वाची अशी गोष्ट म्हणजे आमची इच्छा, आम्ही हिंदूराष्ट्र आहोत. अशी आहे ही होय. आणि म्हणूनच आम्ही राष्ट्र आहोत.''[६]

अशाप्रकारे वरील विवचनावरून एवढे लक्षात येते की, राष्ट्र म्हणजे प्राकृतिक सीमा असलेला देश नव्हे तर राष्ट्र म्हणजे भावना आहे की जी इतिहास घडवून देशाच्या सीमा निश्चित करते.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

**राष्ट्रवाद -**

"अधुनिक इतिहास घडविणाऱ्या ज्या अनेक शक्ती आहेत त्यापैकी राष्ट्रवाद ही एक प्रभावी शक्ती होय. तिचा उगम पश्चिम युरोपात अठराव्या शतकात झाला. एकोणिसाव्या शतकाच्या काळाता राष्ट्रवाद सर्व युरोपभर पसरला आणि २० व्या शतकात तो विश्वव्यापी झाला. राज्यवाद ही इतिहासाची निर्मिती असल्यामुळे भिन्नभिन्न देशात त्या त्या देशातील राजकीय कल्पना आणि सामाजिक रचना यांच्या स्वरूपानुसार राष्ट्रवादाचे स्वरूपही भिन्नभिन्न असल्याचे आढळते."[७]

निकलो मॅकिएव्हॅली हा इटालीतील प्लॉरेन्सचा राहणारा थोर पुरूष, राष्ट्रवादाच्या नव्या विज्ञानाचा जनक म्हणून ओळखला जातो. पाश्चिमात्य हिब्रु व ग्रीक लोकांमध्ये या मूलभूत गुणविशेषाचा विकास झाल्याचे दिसून येते. याही अगोदर भारतीय गणराज्यात दिसून आल्याचे पुढे पाहणार आहोत. मध्ययुगीन काळात धार्मिक भावनेची जागा भक्तिभावनेने घेतली. भक्ती भावनेचा प्रभाव मानवी मनावर होता पुढे भक्ती भावनेची जागा राष्ट्रभावनेने घेतली. भक्तीच्या नऊ प्रकाराप्रमाणेच राष्टीय भावनेचेही प्रकार आहेत. राष्ट्रपूजा, राष्ट्रसेवा, राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्राकरिता सर्वस्व अर्पण, राष्ट्र दैवत.

वर न्मुद केल्योंप्रमाणे १८ व्या शतकात राष्ट्रवादाचा उदय झाला असे मानले तरी राष्ट्रवाद व स्वातंत्र्याच्या भावनेचा उदय पाहता आधुनिक राष्ट्रवादाचे पहिले प्रकट स्वरूप १६ व्या शतकातील इंग्लडमध्ये आढळते. महत्त्वाची गोष्ट अशी की याच शतकात इंग्लडकडे पुढारीपण आले होते. धार्मिक अधिष्ठान आणि व्यक्तिस्वातंत्र्याची संकल्पना यातून इंग्लडच्या राष्ट्रवादाचा उदय झाला.

राष्ट्रवाद म्हणजे काय ? - "राष्ट्रवाद ही एक मनाची अशी अवस्था आहे की, ज्या अवस्थेत व्यक्तीची सर्व निष्ठा राष्ट्राच्या ठिकाणी केंद्रित झालेली असते, स्वतःच्या

जन्मभूमीविषयी प्रगाढ असा जिव्हाळा, राष्ट्री परंपरेविषयीचा उत्कट अभिमान आणि त्या भूमीवरील शासकीय सत्तेसंबंधी अतीव आपुलकी या गोष्टी उण्या अधिक प्रमाणात ऐतिहासिक काळापासून आढळून येतील.''[८]

''समूहाने एकत्र जीवन जगण्याची जिवंत व कार्यक्षम इच्छा Corporate will be nation हेच राष्ट्रवादाचे मूळ आहे.''[९]

राष्ट्रवादाचे अनेक प्रकार आहेत. सांस्कृतिक, आर्थिक, कम्युनिस्ट, जैविक, मानवतावादी, एकदेशीय अतिरेकी मध्यपूर्वेतील राष्ट्रवाद, विश्वव्यापी राष्ट्रवाद.

अशा प्रकारे 'राष्ट्र' आणि 'राष्ट्रवाद' या संकल्पनांचा थोडक्यात आढावा घेता येईल.

**३) राष्ट्रीय कवी आणि राष्ट्रीय कविता -**

भूतकाळातील ज्ञानाने वर्तमान काळातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी लोकांच्या मनामध्ये आशावाद निर्माण करून त्यांना कार्यप्रवण बनविणारा व त्यासाठी आपल्या काव्याचा उपयोग करणारा कवी म्हणजे राष्ट्रीय कवी होय ! व ती कविता राष्ट्रीय कविता होय.

**अ) राष्ट्रीय कवी -**

ग.त्र्यं. माडखोलकरांच्या मते ''सामान्य जनतेच्या आशा अपेक्षांची विचारविकारांशी समरस झालेल्या ज्यांच्या अंतःकरणातून राष्ट्रभावनाच्या लहरी उसळू लागतात तो तो राष्ट्रकवी.'' पुढे त्याच्या कार्याविषयी सांगतात - ''काव्य, जातिवंत काव्य कवीच्याही हृदयाला हलवील असे काव्य सामान्य जनांच्या अंतःकरणात वासनाकामानांत हसण्या रडण्यात भरले असते. ते काव्य ओळखून त्या काव्याचे रहस्य आकळून त्याचा ओघ आपल्या वाणीतून वाहता ठेवणे हे राष्ट्र कवीचे कर्तव्य आहे.''[१०] श्री.कृ.ब.निकुंब यांचा राष्ट्रीय कवीविषयीचा विचार - ''ज्याला भूतकाळाबद्दल

अभिमान असतो, ज्याचे वर्तमानाचे आकलन यथार्थ असते आणि ज्याची भविष्यकाळावर श्रध्दा असते त्यालाच खऱ्या अर्थाने राष्ट्रीय कवी असे म्हटले पाहिजे.''[११]

**ब) राष्ट्रीय कविता -**

राष्ट्रीय कवितेच्या संदर्भात काही विचारवंतानी आपली मते मांडली आहेत. ती पुढीलप्रमाणे - ''विशिष्ट भू-प्रदेशातील व्यक्ती आणि समाजासंबंधी असलेल्या म्हणजेच पर्यायाने संपूर्ण राष्ट्रीय जीवनाला आधारभूत असलेल्या सनातन निष्ठांची जोपासना करणे, देशातील थोर प्राचीन ऐतिहासिक पुरूषांचे आदर्श उदा. चरित्र लोकांना कथन करणे त्या चरित्राद्वारे त्यांच्या वंशजात शौर्य विविध प्रकारचा अभिमान सत्यनिष्ठा धर्मबुध्दी वगैरे राष्ट्रीय गुण विकसित करत राष्ट्र बलशाली व संपन्न बनविणे. आणि एकाचवेळी सर्व लोकांना ज्ञान,उत्साह, आनंद व ईर्षा प्रदान करणे हे प्राचीन राष्ट्रीय काव्याचे महत्त्वाचे कार्य लोकमान्य टिळकांनी सांगितले. राष्ट्राचे अंतःकरण राष्ट्राच्या भावना आणि राष्ट्राचे विकार ज्या कवितेत आविर्भूत झालेले असतात ती राष्ट्रीय कविता असे ग.त्र्यं.माडखोलकर सांगतात.''[१२]

डॉ.प्र.ल.गावंडे यांनी राष्ट्रीय काव्याचा चिकित्सक अभ्यास केला आहे. ते म्हणतात - ''आत्मप्रत्यय, विशालता, ध्येयदायित्व, उत्तेजकता, कृतिप्रेरकता, स्वातंत्र्यनिष्ठा वीर, विभूतीपूजा निसर्ग आणि इतिहास यांनी सिध्द केलेल्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या मार्गावरील विश्वास मातृभूमीचे ऋण फेडण्याच्या भावनेतून देशभक्ती आणि हौतात्म्यातून राष्ट्राच्या पराक्रमाला खरेखुरे तेज चढते या सिध्दातांवर विश्वास आणि मानव हिताचा व्यापक अर्थ ही सर्वच अंगानी असलेली कविता म्हणजे राष्ट्रीय कविता म्हणता येते.''[१३]

प्रदेश, भाषा, पंथ, जाती, व्यक्ती रीतिरिवाज या सर्व घटकांच्या वर उठून समान हितत्वाच्या प्रश्नावर संघटित व प्रतिकारक्षम होण्याची तीव्र जाणीव निर्माण करणारी राष्ट्र, देश, धर्म आणि मानवी कल्याणाकरिता प्रसंगी आत्मोत्सर्ग करण्याला उद्युक्त

करणारी कविता म्हणजे राष्ट्रीय कविता होय.

## ४) राष्ट्रीय कवितेचा उगम इंग्रजी वाड्मयात की राष्ट्रप्रेमात

भौतिक क्षेत्रातील वर्चस्वामुळे युरोपीयन राष्ट्रांनी साम्राज्यवाद स्वीकारला. पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्राने त्याचे अनुकरण केलेही परंतु स्वत्व जागृत झाल्यानंतर राष्ट्रीययत्वाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न सुरू झाला वैदिक वाड्मयातून त्याचा उल्लेख मिळालाही.

पाश्चात्याच्या प्रभावाचे स्वरूप कसे संमिश्र होते हे डॉ.धनंजयराव गाडगीळांनी मोठ्या मार्मिकपणे 'भारत व महाराष्ट्र' या लेखात दाखविले आहे. श्री गाडगीळ म्हणतात - "प्रथम अवमान व अपेक्षा व नंतर शक्य तितके संसर्ग टाळण्याचे प्रयत्न हे यशस्वी न झाल्यामुळे व युरोपीय आक्रमण चालूच राहिल्यामुळे युरोपीय काही बाबतीत वरिष्ठ आहेत. याची उगवती जाणीव, ही तीव्र झाल्यावर त्यांच्या सामर्थ्याच्या मूळ स्थानाचा शोध व विशिष्ट बाबतीत अनुकरण करण्याचा प्रयत्न पण त्याच बरोबरचे आपल्या कल्पना व व्यवस्था याबाबत शक्य तितका कमी फरक व्हावा असा कटाक्ष, तसेच स्वातंत्र्य समता व बंधूभाव वगैरे जी नवीन मूल्ये स्वीकारार्ह अगर ज्यांचा उघड रीतीने पुरस्कार करणे अटळ. तीही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आमच्या परंपरतेच बसतात ही दाखविण्याचा आग्रह. सर्व साधारण आमचा पुरातन काळ उज्वल परंतु मध्यंतरी कारणपरत्वे अधोगती झाली. किंवा प्रगती खुंटली म्हणून समाजात मांडता आले. युरोपीयन पुढे गेले असे स्वतःस व इतरास भासविण्याचा सर्वाचा प्रयत्न सुरू झाला."[१४] डॉ.व्ही.पी.वर्मा या प्रभावाचे विवेचन करताना आपल्या विद्वत्तापूर्ण ग्रंथात लिहितात - पाश्चात्याच्या वाड्.मयाचा भारतीयांवर संमिश्र परिणाम झाला. त्यातही सुप्रसिध्द इटालियन देशभक्त जीसेफ मॉझिनीचा परिणाम सर्वात प्रभावी होता. भारतीय तरूण मॉझिनीच्या राष्ट्रीय विचाराने भारले गेले होते. त्याचे प्रत्यंतर म्हणजे बाबू सुरेंद्रनाथ



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

बॅनर्जी यांनी इंग्रजीत, लाला लजपतराय यांनी उर्दूत आणि ब.सावरकरांनी मराठीत मॅझिनीच्या चरित्राची भाषांतरे केली." पुढे १९२० नंतर कार्ल मार्क्स, लेनिन, मुसोलिनी आणि हिटलर यांच्या प्रभावाखाली साम्यवादी समाजवादी आणि फॉरवर्ड ब्लॉककडे लोक आले होते. पंडित जवाहरलाल नेहरू, मानवेंद्र रॉय आणि सुभाषचंद्र बोस ही नावे या प्रभावाच्या संदर्भात घेता येतील. त्याचबरोबर अमेरिकन, फ्रेंच आणि रशियन या क्रांत्याचेही परिणाम भारतीय पुढाऱ्यांच्या मनावर झाल्याचे स्पष्टपणे जाणवते."[१५] थोडक्यात सांगावयाचे म्हणजे युग धर्माच्या प्रभावापासून भारतीय मन मुक्त नव्हते.

केवळ पाश्चात्याचाच प्रभाव भारतीय मनावर होता असे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून होईल. पाश्चात्यांच्या प्रभावाइतकाच भारतीय अस्मितेचा प्रभावही भारतीय मनावर होता. डॉ.वर्मा पुढे म्हणतात - "पाश्चात्यांच्या विचारांचा प्रभाव भारतीय पुढाऱ्यांच्या मनावर होता हे खरे असले तरी संपूर्ण भारतीय नेते स्वातंत्र्याची चळवळ केवळ पाश्चात्यांच्या आदर्शाने व तंत्राने चालवीत होते. असे म्हणणे म्हणजे राष्ट्रीय इतिहासाला सोयीस्कर बगल देण्यासारखे ठरेल. भारतीयांत देशभक्तीची भावना समर्थ रामदास, छत्रपती शिवाजी महाराज, महादजी शिंदे, रणजितसिंग आणि १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दातील शूर सेनानींनी अखंडपणे प्रज्वलित ठेवलेली होती. विशेषतः महाराष्ट्रात शिवाजी महाराजांनी हिंदू पदपादशाहीची स्थापना केल्यानंतर व पुढे पेशवाईत पहिला बाजीराव पेशवा झाल्यानंतर त्याचे वंशज १८१८ पर्यंत सत्ता सांभाळून होते. या ऐतिहासिक पुराव्यावरून पाश्चात्यांच्या प्रभावाप्रमाणेच हा दुसरा प्रभावही तितकाच जोरदार होता. किंबहुना हा दुसरा प्रभावी वारसा भारताच्या राष्ट्रीय चळवळीला खऱ्या अर्थाने कारणीभूत झाला. हे इतिहासाला मान्य करावे लागते."[१६] प्राचीन भारतीयांच्या वेदांपासून ही राष्ट्रीय भावना लिखित स्वरूपात पाहता येते." तसेच आधुनिक काळात १८५७ चे हे एक ज्वलंत समर उदाहरण आहे. तसेच महाराष्ट्रात मराठी भाषेचा शिवाजी विष्णुशास्त्री

चिपळूणकर यांनी 'निबंधमाला' लिहून नव्या युगाची यशश्री मराठी जनमनाला त्यांचे लेखन प्रमुदित व प्रस्फुरित करू लागले. तसेच १८८५ ते १९२० हे टिळक आगरकर पर्व आहे. या काळपर्वाने राजकीय आणि सामाजिक क्रांतीचे पोषण करणाऱ्या ध्येयनिष्ठ वाड्.मयाच्याच निर्मितीला मुख्यतः वाहिलेला आहे. क्रांती सर्वस्पर्शी क्रांती हा प्राधान्याने या काळातील वाड्.मयाचा नियामक भाव राहिलेला आहे."[१७]

काव्य हा अशा जिवंत मनाचा त्यातील प्रबळ आवेगाचा अनिवार व उत्स्फूर्त उद्‌गार असतो. परवशतेच्या प्रतिकूल काळात किंवा राष्ट्रीय आपत्तीच्या प्रसंगी राष्ट्रभक्तीला प्रखर तेज चढलेले असते. राष्ट्रीय भावना अधिक व्यापक झालेली असते. स्वातंत्र्याचा वा स्वातंत्र्याच्या काळात या भावनेवर एक तवंग आलेला असतो. एखाद्या तात्कालिक संकटाने आव्हान दिले की, माजलेल्या खळबळीमुळे हा तवंग तेवढ्यापुरता बाजूला सारला जातो. प्रतिकूल काळात बाकी संपूर्ण राष्ट्राचे स्वत्व व सत्व पणाला लावले जाते. त्यातून अत्यंत ज्वालाग्राही अशी शौर्यगीते निर्माण होतात. ज्यामध्ये दीर्घकाळापर्यंत प्रेतांनाही पराक्रमाची प्रेरणा देण्याची क्षमता निहित असते. स्थैर्याच्या वा स्वास्थ्याच्या काळखंडात शृंगारिक व सुखवादी काव्याला बहर येतो. प्रतिकूल काळात दैववाद बळावण्याची नेहमीच भीती असते. क्वचित कुठे एखादा स्फूलिंग राखेखाली वाट पाहत दबा धरून बसलेला असतो. एकदम वणवा भडकवून देण्याची आपली ईर्ष्या त्याने जपून ठेवलेली असते. असं स्फूलिंग हाच राष्ट्रीय कवितेचा मूळ स्त्रोत असतो.

**५) मध्ययुगीन काव्यातून आढळणारी देशभक्तीची भावना -**

राष्ट्रवादाचा उदय १६ व्या शतकात झाला. परंतु या राष्ट्रवादासाठी ज्या भावना आवश्यक असतात त्यांची सर्व लक्षणे प्राचीन भारतीयांकडे त्यांच्या साहित्यात दिसून येतात.

डॉ. स्नायडर आपल्या 'व्हेरायटिज ऑफ नॅशनालिजम' या ग्रंथात म्हणतात, "देशाभिमानाची भावना मानवाच्या समूहजीवना इतकी पुरातन आहे. होमर या दंतकथात्मक अंध ग्रीक कवीने या भावने विषयी म्हणतात- आपल्या देशाकरिता मरण्यात एक प्रकारचे दिव्य समाधान व धन्यता आहे."[१८] देशाभिमानाच्या भावनेच्या संदर्भातील श्री स्नायडरचे मत इतर देशाच्या वाङ्.मयाच्या दृष्टीने अधिकृतपणे स्वीकारता येईलच असे म्हणता येत नाही. परंतु भारतातील सर्वात प्राचीन असे वैदिक साहित्य त्या मताचा पाठपुरावा करणारे आहे. अथर्ववेदातील ऋचेव्दारे ऋषी सांगतात - "जगत कल्याणाच्या उदात्त हेतूने स्वर्विद ऋषीनी आपल्या उग्र तपाचरणाव्दारे बळ आणि ओजाची निर्मिती केली." ऋग्वेदातील विविध ऋचामधून या संघभावनेचे आविष्कार दिसून येतात. तसेच अथर्ववेदातील पृथ्वीसूक्तातील मंत्र वाचल्यानंतर मातृभूमीबद्दल किती आत्मीयता आणि अभिमान होता हे दिसून येते.

या सर्व विश्वात जम्बुदीपातील भारतवर्षाचे एक वेगळेच स्थान आहे. कारण इतर सारे भूप्रदेश हे केवळ भोगभूमी असून एकटा भारतवर्ष कर्मभूमी आहे. ग.त्र्यं.देशपांडे म्हणतात - "भारताचे प्राणभूत वाग्धन म्हणजे वेद. वेदातील सर्वज्ञान आणि महापुरूषाच्या चरित्रगायनाच्या स्वरूपात त्यांना नवीन उजाळा देऊन त्यांनी वेदार्थाचे उपबृंहूण केले"[१९] भगवान रामचंद्राच्या रूपाने वाल्मिकीनी आपल्यासमोर आदर्श राष्ट्रनेता उभा केला तर व्यासांनी राष्ट्रीय जीवनातील संघर्षाचे स्वरूप उकलून दाखविले.

**६) संतानी राष्ट्रीय कार्य बजावले -**

सूक्ष्म विचार केला तर संतानी राष्ट्रीय कार्य बजावले असे निःशंकपणे म्हणता येते.

नुसत्या महाराष्ट्राचा प्रश्न घेतला तर १३ व्या शतकापासून झालेली इस्लामी आक्रमणे ही एकेरी नसून दुहेरी होती. राजकीय आणि भौतिक तसेच धर्मावरही आक्रमणे

होती. ही परतविण्यासाठी संतांनी रामायण, महाभारतातील आदर्श नायकांनी प्रतिकूल परिस्थितीशी लढा देताना आपले स्वत्व कायम राखले होते. असे लोकांना सांगितले. उदा.- संत एकनाथाचे 'भावार्थ रामायण' तसेच रामदासाच्या वाड्.मयातून 'महाराष्ट्र धर्म' ही कल्पना मांडली आहे. ''मराठा तितुका मेळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा'' असे सांगितले. तसेच. स्वर्धमरूपी यज्ञाकडे दुर्लक्ष करू नका, भौतिक भोगाच्या पाठीमागे लागून प्रमत्त व्हाल तर पश्चाताप करण्याची पाळी येईल. असे सांगितले म्हणून तर - ''राईज ऑफ दि मराठा पावर'' या सुप्रसिध्द ग्रंथात न्या.म.गो.रानडे यांची संताच्या चळवळीतून छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व उदयाला आले असे जे म्हटले आहे. त्यातले रहस्य हेच आहे. तर डॉ.ग.त्र्यं. देशपांडे म्हणतात - ''संतांनी कोणाचीही राज्यसत्तेची सुध्दा तमा न बाळगता समाजातील सर्व स्तरांच्या जीवनाचे त्यांनी सूक्ष्मतेने विश्लेषण केले व ज्या निर्भयतेने त्यांनी त्यांच्यावर प्रहार केले तेवढी निर्भयता आणि सूक्ष्म दृष्टी क्वचितच अन्यत्र दिसेल, त्यांनी प्रत्यक्ष राजकारण केले नसेल पण उत्तम राष्ट्रनेते त्यांनी निर्माण केले यात शंका नाही.'' [२०] न्या.रानडे,लो.टिळक, महात्मा गांधी, या नेत्यांनी राष्ट्रीय चळवळीकरिता लोकांना उद्युक्त करताना संताच्या पध्दतीचा उपदेश केलेला असल्याचे आढळून येईल.

पंडिती काव्यात रामायण, महाभारत व त्यातील आख्याने सांगून ती लोकप्रिय करण्याची भूमिका पार पाडली ती राष्ट्रीय भूमिकाच होती.

### ७) शाहीरांच्या कवितेतील राष्ट्रीय भावना -

खऱ्या अर्थाने शाहिरी काव्याने सूज्ञ लोकांना व अज्ञ लोकांनाही राष्ट्रीयतेची जाण आणून दिली. ती लोकांच्या मनापर्यंत जाऊन भिडली.

आपल्या राजकीय राष्ट्रीयत्वाचे काही ठळक पुरावे सामान्यपणे भारताच्या आणि प्राधान्याने महाराष्ट्राच्या इतिहासाद्वारे आपण पाहिलेले आहेत. या पुराव्याद्वारे व्यक्त

होणाऱ्या राष्ट्रीय भावनांची प्रचिती ज्या साहित्यातून प्रामुख्याने येते त्या साहित्याचे नाव शाहिरी वाड़मय आहे. या शाहिरांच्या कृपेमुळेच आमच्या ऐतिहासिक पूर्वजांच्या पराक्रमाचा इतिहास आम्हाला आज उपलब्ध झालेला आहे.

प्रा.मा.का.देशपांडे म्हणतात - "प्राचीन महाकाव्याचा कर्ता एकच कवी नसून शतकानुशतके ज्या लोककथा पोवाडे त्रुटित गीते निरनिराळ्या काळांत लिहिली गेली. त्याचे संकलन या महाकाव्यात आढळते."[२१] हे विधान मान्य केले तर राष्ट्रीय काव्य म्हणून शाहिरी वाड़मयाचे स्थान किती महत्वाचे आहे हे चटकन लक्षात येते.

शं.गो.तुळपुळे जुन्या पोवाड्यांचा उल्लेख ११०० मधील माहिकावतीच्या बखरीत सांगतात. तर न.चिं.केळकर म्हणतात - जुन्या महाराष्ट्र सारस्वतात राष्ट्रीय काव्य थोडे सापडते. समर्थाची स्फुट प्रकरणे,अनंत फंदीचे माधव काव्य नारायणरा पेशव्यांच्या वधावरील काव्य, एवढेच आहे. पोवाड्याच्या निर्मितीच्या बाबतीत प्रा.म.ना.अदवंत म्हणतात - पोवाडे हे बहुधा राष्ट्राच्या अभ्युन्नतीच्या काळीच उदयाला येत असतात. ज्या वेळी राष्ट्रात भौवताली पराक्रमाला बहर आलेला असोत. रणशिंग जोमाने फुंकले जात असते. म्यानातून तलवारी बाहेर काढून भाले बर्च्या सरसावून शत्रूशी सामना देण्यासाठी उत्साहाने वीर बाहेर पडत असतात. त्याचवेळी त्यांचे पराक्रम गाण्यासाठी शाहिरांच्या डफावर थाप पडते. त्यामुळे मराठी शाहिरांचा उदय शिवकाळात झाला आणि त्यांच्या कवनांना बहर पेशवेकाळात आला. तर त्यात नवल काहीच नाही."[२२]

हल्ली जुन्यात जुना पहिला उपलब्ध पोवाडा "अफझुल खानाचा वध" हा अगीनदास नावाच्या शाहिराने लिहिलेला आहे."[२३] पोवाड्यात अनेकांनी त्याच्या कार्यावरून विशेषणे बहाल केली आहेत. शाहिरांची गाणी हीच मराठ्यांची खरी गाणी आहेत असे महाराष्ट्र सारस्वतकार वि.ल.भावे म्हणतात. तर अच्युतराव कोल्हटकर

या काव्याला मराठी काव्याची पहाट म्हणतात. अ.ना.देशपांडे हजारो लोकांच्या शिक्षणांचे आणि जागृतीचे कार्य करणारे एक साधन म्हणतात. ते यथार्थ आहे.

पोवाड्यातील राष्ट्रपुरूष शिवाजी महाराज आहेत. तसेच पराक्रमी पुरूष, पानिपतच्या युध्दापासून खडकी आष्टीपर्यंतच्या लढाईत अनेक ऐतिहासिक घटनांवर पोवाडे रचले गेले. पोवाडे रचणारे शाहीर आनंद फंदी, परशराम, होनाजीबाळा, प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ, पठ्ठे बापूराव आहेत.

मराठी पोवाड्यांचे शरीर मराठी असले तरी आत्मा भारतीय आहे. कारण मराठी मन, मराठी मनगट, मराठी पोषाख, मराठी भाषा, मराठ्यांची सुखदुःखे यामुळे मराठ्यांचे पोवाडे प्रादेशिक वाटत असले तरी मराठ्यांच्या जीवनाचे अधिष्ठान भगवद् गीता हेच आहे. ज्ञान आणि भक्तियुक्त निष्काम कर्मयोग हाच त्याचा धर्म आहे. शाहिरांनी नैतिक व्यवहारिक राजकीय आदींवर पोवाडे, कवणे, फटके लिहिले.

श्री अदवंत यांनी पोवाड्यांची गणना राष्ट्रीय कवितेतच केलेली आहे. ते म्हणतात "शाहिरीकाव्य त्या काळाची राष्ट्रीय कविता होती. त्या काळातली राष्ट्रीय घटना व राष्ट्रीय पुरूषांचे पराक्रम तिने वर्णन केले."[२४]

**९) राष्ट्रीय कवितेची प्रेरणा व व्याप्ती -**

राष्ट्रीय भावना किंवा राष्ट्रीय कविता ही मानवाच्या 'आम्ही' या भावनेतून उदयाला आली. व तिचे प्रकार मानवाच्या भावभावना इकडे विविध आहेत -

**प्रेरणा -**

विविध प्रकारच्या घटना प्रसंगानी, क्रिया प्रतिक्रियाची निसर्गाशी केलेल्या लढयांनी तसेच मानवजातीतील संघर्षांनी मानवजीवनाचा इतिहास व्यापलेला आहे. मानवाने उपभोगलेल्या, अनुभवलेल्या आणि त्यापासून संपादन केलेल्या ज्ञानाचे वर्तमानासाठी व भविष्यासाठी मार्गदर्शक होणारे नीलचित्र (ब्लु प्रिंट) साहित्याच्या रूपाने सुरक्षित

ठेवलेले आहे. त्यामुळे इतिहास वंश, परंपरा, धर्म, संस्कृती, जन्मभूमी, निसर्ग, या सारखा अभौतिक आणि भौतिक घटकांचे स्मरण ताजे राहिलेले आहे. या सर्व संचितांशी 'आम्ही' ही राष्ट्रीय जाणीव जोडण्याचे कार्य यापूर्वीच माणसाने केले आहे. राष्ट्रीय जाणिवेच्या स्पर्श झालेल्या सर्वच वस्तूचे असच आपल्याला महत्त्व वाटते. त्यात एक वेगळी आत्मीयता निर्माण होते.

इतिहासाशी कवी आपले नाते पूर्वजांच्या अभिमानाच्या माध्यमातून जोडतो आणि मग पूर्वजांच्या अभिमानाची गाणी गाता गाताच वर्तमान कालातील विपण्ण आवस्थेचीही गीते गात असतो. राष्ट्रीय कविता या प्रक्रियेतूनही निर्माण होते असे प्रा.अदवंतानी दाखविले आहे.''[२५]


**व्याप्ती -**

ज्या कवितेला आपण राष्ट्रीय कविता म्हणून ओळखतो तिचे भावनात्मक स्वरूप विविधतेचे आहे. या विविध भावना देश या तत्त्वांशी निगडित आहेत. म्हणूनच देशभक्तीचा उत्कट अविष्कार करणारी. देशातील लोकांच्या सामान्य सुखदुःखाची अभिव्यक्ती सुवर्णाक्षरांनी रंगलेल्या गौरवमय भूतकाळाचे त्यातील वीर विभूतिपूजनाचे दर्शन घडविणारी. वर्तमानाचे यथार्थ आकलन आणि भविष्यासंबंधी उत्कट श्रध्दा यांचे सजीव चित्रे रेखाटणारी स्वधर्माचा स्व-संकृस्तीचाच नव्हे तर संपूर्ण राष्ट्रीय अस्मितेचा अभिमान व्यक्त करणारी, राष्ट्रात ऐक्यभावनची निर्मिती करणारी स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा आणि पारतंत्र्याची तीव्र चीड व्यकत करणारी. विविध स्वरूपाच्या विषमतेविरूध्द आणि न्यायासाठी बंड करण्याला प्रवृत्त करणारी, राष्ट्रातील विविध तत्त्वासंबंधी अंतःकरणात उत्कट भक्ती आणि श्रध्दा निर्माण करणारी, खचलेल्या परिस्थितीत ध्येयदर्शित्वाचा यतोचित संदेश देवून संपूर्ण राष्ट्राला स्फुर्ती देणारी, दैवी

संपत्तोने संपन्न असे धैर्य आणि उत्साह धारण करणारे. राष्ट्रीय कार्यकर्ते निर्माण करण्याचे अचाट सामर्थ्य असणारी. व्यक्तीलाच नव्हे तर संपूर्ण राष्ट्राला उत्थानशील कार्यतत्पर आणि स्वाभिमानी बनविणारी कविता म्हणजे राष्ट्रीय कविता होय.[२६]

व्याप्ती व मर्यादांचा आलेख [२७]

**आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कविता.**



## १०) राष्ट्रीय चळवळीचा मराठी साहित्य व काव्यावर परिणाम -

१९ व्या शतकात महाराष्ट्रामध्ये इंग्रजी शिक्षण घेऊन एक नवी पिढी उदयाला आली. या ज्ञानी मंडळींना स्वत्वाची जाणीव झाली. पारतंत्र्याची बोचणी लागली समाजसुधारणा करण्याचा ध्यास लागला. यातूनच एक राष्ट्रीय चळवळ निर्माण झाली. त्यांच्या विचारांचा सर्व क्षेत्रावर प्रभाव दिसू लागला अर्थात काव्यावरही आपण या मुद्द्यात काही राष्ट्रीय विचारवंताच्या कार्याचा आढावा थोडक्यात पाहूया.

१) भारतीय स्वातंत्र्याला पहिली हाक दिली असे श्री त्रियोळकर म्हणतात की, दादोबा तर्खडकर यांनी दादोबांच्या मते पारतंत्र्य मिळाले. आपल्या लोकांच्या दुर्बलपणामुळे व विद्यारहितपणामुळे लोकहितवादींनीही स्वातंत्र्यासाठी या मताचाच आग्रह धरला.

२) महर्षी स्वामी दयानंदाच्या आर्य समाजाची स्थापना होण्यापूर्वी महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराला आळा घालण्याचे कार्य स्वयंप्रेरणेने, विष्णु किंवा ब्रम्हचारी यांनी केले. तसेच विश्व कुटुंबाची शिकवण दिली. राष्ट्रभिमानाचे एक प्रमुख अंग म्हणजे धर्माभिमान होय म्हणून त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने राष्ट्रीय कार्य होते.

३) अखिल भारतीय नेतृत्व म्हणून ज्या महाराष्ट्रातील लोकांचा गौरव झाला त्यात दादाभाई नौरोजी हे अग्रगण्य होते. ईस्ट इंडिया पिनन्स कमिटीपुढे साक्ष देऊन ब्रिटीशांच्या सत्तेचे वाईट अंतरंग त्यांनीच चव्हाट्यावर मांडले.

४) 'समग्र फुले' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत लक्ष्मणशास्त्री जोशी फुल्यांविषयी म्हणतात "स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताकाच्या अधिष्ठानाला आवश्यक असलेली मूलभूत मानवी समानतेचा पुरस्कार करणारी आणि जातीभेद व धर्मभेद यांना धिक्कारणारी विचारसरणी नर व्याघ्राचे अग्रणी असलेल्या ज्योतिरावांनी आवेशाने

सांगितली.''[२८]

५) महाराष्ट्रालाच नव्हे तर अखिल भारतवर्षाला ज्यांच्या कार्याबद्दल अभिमान वाटावा असा थोर नेता महाराष्ट्रात जन्माला आला. भारतीय आध्यात्मिक उदारमतवादाचा उद्‌गाता महाराष्ट्राचा सॉक्रेटिस, मराठ्यांच्या इतिहासावर भाष्य करणारा सेंट ऑगस्टीन व टॉग्न्वी म्हणजे न्यायमूर्ती रानडे परंपरेने आलेल्या राष्ट्रीत्वाचे भान भारताला आणून देण्याचे महत्त्वाचे कार्य आपल्या ग्रंथाद्वारे केले. म्हणूनच राष्ट्रीयत्वाचे जनकत्व त्यांना दिले जाते. गांधींचे गुरू गोखले तर गोखल्यांचे गुरू रानडे होते.

६) एक पाय तुरूंगात ठेवून देशोन्नतीसाठी लेखणी हाती घेतलेले महाराष्ट्रातील राष्ट्रकवीचे प्रवर्तक विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमाला, यातून मानसिक उन्नती हेच देशोन्नतीचे प्रधान साधन होय. असे सांगितले व समाजासाठी व्यक्तिसुखाचा होम करण्याची आणि बिकट परिस्थितीवर मात करून प्रतिकार क्षमता टिकवून धरण्याची ताकद ध्येयवादाशिवाय येत नाही.'' हा ध्येयवाद चिपळूणकरांनी महाराष्ट्राला शिकविला.

७) निश्चयाचे महामेरू स्वातंत्र्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे व तो मी मिळवणारच असे सांगणारे लोकमान्य टिळक. त्यांचे विचार - हिंदुस्थानात राहणारे आपण सर्व एक आहोत. पारतंत्र्याची जाणीव आणि राजकीय स्वातंत्र्याची उणीव सर्वांनाच समान जाचक ठरत आहे. त्यामुळे सहवेदना, सहानुभूती, प्रेम, औदार्य आणि सहनशीलता हे गुण राष्ट्रातील लोकांच्या ठिकाणी निर्माण व्हावेत. त्यातून त्यांचे सहजीवन निर्माण व्हावे अशी त्यांची इच्छा होती. आपल्या हयातभर याच तत्त्वांना पुढे ठेवून त्यांनी राष्ट्राचे नेतृत्व केले.

८) तत्त्वज्ञानाच्या अधिष्ठानावर विश्वाविरूध्द उभे राहण्याची परंपरा भारतात प्रथम

निर्माण करणारा महामानव अशा शब्दात डॉ. पु.ग.सहस्त्रबुद्धेयांनी गौरव केला. केसरीतील व सुधारकातील आगरकरांच्या लेखामुळे लोकमान्य टिळक त्यांना "धीर पुरूष" संबोधून पक्के स्वराज्यवादी म्हणतात. ही महाराष्ट्र धर्मामुळे म्हणजेच वर्णाश्रम धर्मामुळे झाली असे राजवाड्यांचे प्रतिपादन आहे. भक्तिमार्ग वैयक्तिक मुक्तीचा मार्ग असून महाराष्ट्र धर्म हा राष्ट्रधर्म आहे. नॅशनॅलिझम आहे.

९) सर्वांगीण विकासाने एक विकसनशील राष्ट्र बनून अखिल विश्वाचे ऐक्य, विकास आणि कल्याण करण्यासाठी आपल्या राष्ट्रात मार्गदर्शन करावे अशी आधुनिक महाराष्ट्राचा बृहस्पती डॉ.केतकरांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी आपली सर्व प्रज्ञा प्रतिभा, पांडित्य व कर्तृत्व आणि सर्व क्रियात्मक शक्ती पणाला लावल्या म्हणून समाजशास्त्राच्या दृष्टिकोणातून राष्ट्रवादाचा अभ्यास करणारा भारताचा पहिला देशभक्त मानतात.

१०) हिंदुस्थान हा देश, हिंदूजाती, हिंदूधर्म, हिंदूसंस्कृती आणि हिंधूभाषा या हिंदूराष्ट्रपंचका संबंधी दोघाही सावरकर बंधूना पराकोटीचा अभिमान आहे. किंबहुना परंपरेच्या अधिष्ठानावरच त्यांच्या राष्ट्रवादाची उभारणी झालेली आहे.

११) अध्यात्मनिष्ठ राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारे युगपुरूष महात्मा गांधी होत. डॉ.वि.का.गर्दे सांगतात - "गांधीजी कट्टर राष्ट्रवादी असले तरी त्यांनी मानव्यावर भर दिला त्या दृष्टीने ते आंतरराष्ट्रीयतेचे पुरस्कर्ते होते."[२९] राष्ट्रवाद आक्रमक विधायक अथवा व्यावर्तक नसावा तर 'विधायक' मानवतापोषक असावा या गांधीच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील साहित्यात एक गांधीयुग अस्तित्वात आलेले असून कथा, कांदबरी, कविता, निबंध इतिहास इत्यादी प्रकारचे साहित्य निर्माण झाले.



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

१२) आधुनिक भारतवर्षाचे ज्ञानमहर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते - ''पक्षाचे मत राष्ट्रहितापेक्षा श्रेष्ठ मानले तर भारतीयांचे स्वातंत्र्य दुसऱ्यांदा धोक्यात येईल आणि कदाचित ते कायमचे नष्ट होईल. तरी रक्ताचा शेवटचा थेंब शरीरात असेपर्यंत आपण आपल्या स्वातंत्र्यासाठी चढण्याचा निर्धार केला पाहिजे.

अशा विविध महाराष्ट्रीय राष्ट्रवाद्यांच्या विचाराने मराठी साहित्य व काव्यावर परिणाम झाला व एक दिशा मिळाली हे नक्की.

**११) मराठी राष्ट्रीय कवितेचा विकास -**

कोणत्याही साहित्यप्रकाराचा अभ्यास करण्याच्या ज्या विविध पध्दती रूढ आहेत. त्यापैकी कालसापेक्ष दृष्टीने अभ्यास करण्याची एक पध्दत असून ऐतिहासिकदृष्ट्या तिला महत्त्वाचे स्थान आहे. आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचा अभ्यास करताना ही पध्दत उपकारक ठरण्यासारखी आहे. आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचे एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून तो स्वातंत्र्यातील काळापावेतो पाच कालखंड पाडता येतात.

१) पूर्वस्मृतिकालखंड (इ.स.१८५० ते इ.स.१८७४)

२) राष्ट्रीय जागृतीचा कालखंड (इ.स.१८७४ ते इ.स.१९०५)

३) राष्ट्रीय कवितेचे सुवर्णयुग (इ.स.१९०५ ते इ.स.१९२२)

४) राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा कालखंड (इ.स.१९२२ ते इ.स.१९३५)

५) संमिश्र वैचारिक प्रभावाचा कालखंड (इ.स.१९३५ ते इ.स.१९५०)

पूर्व स्मृतिचा कालखंड - (१८५० ते १८७४) आधुनिक राष्ट्रीय मराठी कवितेचा पहिला कालखंड हा सुमारे चोवीस वर्षाचा कालखंड आहे. करण काही अभ्यासकांनी इ.स.१८१२ या ब्रिटीश सत्तेच्या आरंभकाळापासून या काळाची गणना केली आहे.

आरंभीचे बहुतेक काव्य अनुवादित व भाषांतरित असल्याने १८५० मानतात.

१) पूर्व - स्मृतिकालखंडाला उपकारक ठरणाऱ्या काही संस्थाचे व नियतकालिकांचे कार्य - १८२२ मध्ये बॉम्बे नेटिव्ह स्कूलबुक ॲड सोसायटी, ही संस्था निर्माण झाली. त्यामुळे विविध विषयावरील ग्रंथाची निर्मिती झाली. उदा. राजा शिवाजी

२) मराठी ज्ञान प्रसारक, विविध ज्ञानविस्तार व सर्वसंग्रह या नियतकालिकाने प्राचीन काव्य प्रसिद्ध केले.

३) इ.स.१८५१ दक्षिणा प्राईज कमिटी स्थापन करून साहित्यनिर्मिती करून घेतली उदा.म.मो.कुंटे याचे श्री छत्रपती महाराजांवरील काव्य या प्रयत्नातून आले की जे आधुनिक मराठीतील पहिले राष्ट्रीय आणि वीरसपूर्ण काव्य आहे.यांनी महाराष्ट्र धर्म सांगितला - "मनी वागवावी कथा ती गितेची

मरू झुंजत चाल ही क्षत्रियांची

जरी फौज नाही कराया चढाया

तरी धैर्य आहे, लढू या मरू या"[३०]

४) ज्ञान चन्द्रोदय, नवनीत, सर्व संग्रह या मासिकांनी प्राचीन मराठी वाङ्‌मयाकडे लक्ष वेधण्याचे कार्य केले.

५) मराठीतील राष्ट्रीय कवितेची पायाभरणी अव्वल इंग्रतीजील बाळशास्त्री आदी पंडित कवीनीच केली. प्राचीन भारतीय काव्याचे पुनरूज्जीवन केले.

६) गो.वि. कानिटकर यांचे नारायणराव पेशवे हे ऐतिहासिक काव्य.

७) वासुदेव वामन शास्त्री खरे यांनी यशंवतराय महाकाव्यात स्वकीयांच्या भुतकालीन वैभवाचा व पराक्रमाचा जसा गौरव केला. तसेच स्वदेशभक्ती व स्वातंत्र्याचे स्त्रोत गायिले आहे.

८) कवी हंसराजांनी वेदांतासारख्या आध्यात्मिक विषयावर सुबोध मराठीत ओवीबद्ध

रचना केली

९) परशुराम गोडबोले यांनी अध्यात्मिक व नैतिक शिकवण दिली.

१०) कृष्णशास्त्री चिपळूणकर,माधवराव, पाळंदे, कुरूंदवाडकर, पारखी यांनी सांस्कृतिक पुनरूज्जीवनाचा प्रभाव या कवीने पाडला.

११) कृष्णाजी आठल्ये 'भीमकर्मा राघोबा' या काव्यातून पूर्वजस्मृतीचा परिचय करून देतात. यांच्या प्रमाणे लोंढे यांनी बोधसुधा, बोधशतक, बोधमाळा या कविता लिहल्या यांच्या प्रमाणे भांडारेनी ही काव्य लिहले.

१२) गंगाधर मोगरे यांनी अभिनव कांदबरी काव्य लिहले.

१३) वामन ओकांनी दीर्घ आणि स्फुट काव्य निर्मिती केलेली आहे.

१४) महाराष्ट्र कवी पुरूषोत्तम जोशी यांनी 'भारत वर्षिणी' आदी काव्ये लिहली.

**समारोप -**

अनेक कवी १८७४ नंतरही काव्यनिर्मिती करीत होते. परंतु काटेकारपणे विभागणी करणे जवळ-जवळ अशक्य या काळखंडातील प्रवृत्तीला प्राधान्य देण्यात आलेले आहे. सामान्यपणे या कालखंडातील कवींनी आपल्या पराक्रमी पूर्वजांच्या स्मृतीला उजाळा देण्याचे कार्य केले. या काळखंडात सौदर्याला मूल्याला अधिक प्राधान्य मिळाले आशयापेक्षा अभिव्यक्तीला महत्त्व आले.

प्रा.भ.श्री.पंडितांनी इंग्रजी राजवटीतील परंपरा सांगताना लोक कवीची चवथी परंपरा सांगितली आहे आणि या परंपरेत समाजसेवकाचा समावेश केला आहे. त्याची भूमिका मांडताना पंडित म्हणतात. "असंख्य देशबांधवाचे दु:ख,दैन्य,दास्य व चरित्र पाहून त्यांचे अंत:करण कळवळत होते. त्यांची पदयरचना ही त्या कळवळ्याचा शाब्दिक अविष्कार आहे. त्याचे वाड्मय हे खरेखरे लोकभिमूख वाड्मय आहे."[३१] म्हणूनच

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

पंडितांच्या मते नुसती राष्ट्रीय कर्तव्यासंबंधीची जाणीव बरेच काही करून जाते.

१) इंग्रजी काव्यापासून अनेकांनी प्रेरणा घेतली परंतू इंग्रजांच्या राष्ट्र प्रेमाचे आणि स्वांतत्र्य प्रेमाचे स्तुतिस्तोत्र गाणारी गीते मराठीत अनुवादित केली नाहीत. त्यांनी एकतर कथाकाव्ये निवडली किंवा भावगीतात्मक रचनांचा अनुवादासाठी स्वीकार केला.

**२) राष्ट्रीय जागृतीचा कालखंड इस १८७४ ते १९०५**

या कालखंडात 'बहुता दिसाचे मातलेले बंड' या मराठीच्या शिवाजीने कणखर पणे मोडून काढले. आपल्या राष्ट्रीय अस्मितेचा अभिमान उद्दामपणे आविष्कृत करण्याचे, प्रंचड जनजागरणाचे क्रांतिकारक कार्य ज्या तेजस्वी महापुरूषाने केले त्याचे नाव विष्णुशास्त्री चिपळूणकर होय त्यांना कर्तृत्ववान देशभक्तांचा निर्माता असे म्हणतात. निंबधमालेच्याव्दारे सतत सात वर्षे स्वाभिमनाचे बीजारोपण केल्यावर कल्पनांची काव्ये निर्माण करण्यास समर्थ अशी कवींची मनोभूमी तयार होऊ लागली. यानंतर लवकरच केशवसुताची कविता प्रगट झाली"[३२] असे कोल्हटकर म्हणतात.

१) आधुनिक मरांठी कवीचें कुलगुरू केशवसुत - एकंदर समाजाच्या राष्ट्रीय भावना जी उद्दिपित करू शकेल तीच खरी राष्ट्रीय कविता. या पार्श्वभूमीवर केशवसुतांच्या सामान्यपणे आठ कवितातून राष्ट्रीय भावनांचे दर्शन घडते. उदा.एका भारतीयांचे उद्गार 'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून,' 'तुतारी' 'स्फुर्ती' 'नवा शिपाई' आदी.

२) रे.नारायण वामन टिळक - ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करूनही रे टिळकांची देशभक्ती व राष्ट्रनिष्ठा केशवसुतांपेक्षा अधिक जाणवते. त्यांच्या 'माझ्या जन्मभूमीचे नाव', 'स्वदेशभक्ती माझ्या जन्मभूमीस', 'प्रियकर हिंदीस्तान' आदी कविता आहेत.

भावना कल्पना आणि शब्दयोजना यांचे संयोजन उत्तम प्रकारे त्यांच्या राष्ट्रीय गीतांतून झालेले आहे. राष्ट्रीय भावनाचा उत्कट आविष्कार करणारी रे टिळकांची कविता राष्ट्रीय नाही असे कोण म्हणेल ?

३) राजकवी चंद्रशेखर - स्वाभिमानाची निर्मिती, राष्ट्रभिमानाचे पोषण, संघशक्ती प्रपात आणि राष्ट्रीय ऐक्य या सर्व घटकांचे पोषण करणारी कविता चंद्रशेखरांना राष्ट्रीय कविता म्हणून अभिप्रेत आहे. राष्ट्रभक्तीचा आविष्कार चंद्रशेखरांच्या अनेक कवितातून झालेला दिसतो. प्रामुख्याने स्वदेश प्रीती, इतिहास माधविधन, कविता रति, हिन्दवंदना, महाराष्ट्र दर्शन, खर्ड्याची लढाई आदी कवितेत दिसतो.

४) कवी माधवानुज - माधवानुज हे ध्येयवादी कवी होते. राष्ट्रभक्ती हा त्यांचा ध्येयवादाचा विशेष म्हणावा लागेल. माधवानुजांनी वीर विभूतीपूजन वर्तमानकालीन आशय असलेल्या ऐतिहासिक, पूर्ववैभवाचे स्मरण आणि पारतंत्र्यचे दुःख त्यांच्या कवितेतून दिसून येते उदा - धन्य कोण ? सज्जन गड, छत्रसाल आणि शिवाजी भेट त्यांची भूमिका भूतदयावादी आहे.

५) दत्त रेंदाळकर गोविंदाग्रज आणि बालकवी - कवी माधवानुजांकडून विनायकांकडे वळण्यापुर्वी या चार कवींच्या राष्ट्र कवितांची ओळख करूया १) दत्त कवींनी त्यांचा सात कवितेतून स्वातंत्र्याचा उदो उदो करणाऱ्या इंग्रज राज्यकर्त्यांना सवाल केला आहे. 'स्वतंत्रतेज' 'मावळ्यास निमंत्रण,' 'वर्ष प्रतिपदा' आदी कविता आहेत. २) अनुवादे रेंदाळकर यांच्या ५/६ च कविता आहेत. त्यांना प्राचीन परंपरेचे आकर्षण होते. त्यांच्या 'भारत माता' 'द्रोपदी' आदी कविता आहेत. ३) प्रतिभेची झेप गोविंदाग्रजाकडे होती पणं त्या मार्गाने त्यांना जावयाचे नव्हते त्यामुळे अगदी कमी राष्ट्रीय कविता लिहिल्या म्हणून डॉ. रा.शं.वाळिंबे वरील कवीविषयी म्हणतात - राष्ट्रीय कवितेचा वेगवान पावन प्रवाहात प्रवेश करून तरंगण्याची संधी चालून आलेली

असतानाही केशवसुत, गोविंदाग्रजादी यांच्याप्रमाणे बालकवीही काठाशी बसून चार तांबे डोक्यावर घेवून स्नान करून मोकळे झाले.

६) राष्ट्रकवी विनायक - आधुनिक मराठीतील राष्ट्रीय कवितेचे युग राजा शिवाजी कवी म.मो.कृत्यांनी सुरू केले. तरी राष्ट्रीय कवितेचे उद्‌गाते म्हणून विनायकांना ओळखतात. तसेच त्यांच्याकडे राष्ट्रभक्ती व काव्य भक्ती आहे. ध्येयनिष्ठेची निश्चिती व श्रेयाच्या मार्गाचा स्वीकार केल्यामुळे समकालीनांच्या तुलनेत अत्यंत विनयशील आणि विनम्र झालेले आहे. डॉ.अ.ना. देशपांडे त्यांच्या विषयी म्हणतात - ''वैभवशाली आणि पराक्रमी पूर्वजांच्याबद्दल अभिमान जागृत करून जनमनात राष्ट्राभिमानाची ज्योत चेतविणाऱ्या विनायकांनी आपल्या कविताद्वारे जो प्रयत्न केला तो टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादाशी पूर्णपणे जुळणारा असाच होता.''[३३]

अशाप्रकारे चिपळूणकरांची विचारधारा केशवसुतांची अभिव्यक्ती या कालखंडातील कवींच्या राष्ट्रीय कविता आणि राष्ट्रकवी म्हणून विनायकांच्या उदय ठळक गोष्टी दिसून येतात.

**३) राष्ट्रीय कवितेचे सुवर्ण युग (इ.स.१९०५ ते इ.स.१९२२)**

या कालखंडात लोकमान्यांच्या विचारांचा प्रभाव आहे. तसेच ब्रिटीश सत्तेचे जुलमी अन्यायी, अत्याचारी खुणशी स्वरूप भारतीयांना या काळात प्रतीत झाले. ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी शक्तीला धक्के देण्याचे, सत्तेविरूध्द प्रक्षोभ निर्माण झाल्याचे दृश्यही याच कालखंडात दिसून येते.

रशियावर जपानने विजय मिळविल्यामुळे भारतीयांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. बंगालच्या फाळणीमुळे पूर्ण भारतात वंग बंग चळवळ सुरू झाली. बारिसाळच्या हत्तेने असहकार विरोध व क्रांतीच्या मार्गाकडे भारतीय वळले. तर ब्रिटीशांनी ते दडपण्याचे तत्व अवलंबले . यामुळे काव्याच्या क्षेत्रात अव्वल राष्ट्रीय कविता निर्माण झाल्या



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यांचा आढावा पुढीलप्रमाणे घेवू -

**१) बी -**

बी च्या राष्ट्रीय कवितेचा आधार एकच आहे तो म्हणजे जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्रांती व्हावी. त्यांची परंपरा खरीखुरी राष्ट्रीय परंपरा आहे. त्यांचा विवेकनिष्ठ राष्ट्रवाद आहे. समकालीन राष्ट्रीय विचारांच्या जागृतीचे एक अत्यंत प्रभावी साधन म्हणून बी नी आपली बहुतेक राष्ट्रीय कविता लिहली. राष्ट्रीय जीवनाशी एकरूप झाल्याने स्वरूप आध्यात्मिक झाले आहे. त्यांच्या कवितेतून पुनरूज्जीवन भारतीय अस्मितेचे स्फुरण, विभूतीपुजन आदीचा समावेश आहे.

**२) भा.रा.तांबे -**

तांब्याच्या राष्ट्रीय काव्यात पूर्व वैभवाचे स्मरण वीर विभूतिपूजन पारतंत्र्याची जाणीव, वर्तमानाचे यथार्थ, प्रतिबिंब आले आहे. तांब्याच्या राष्ट्रीय कविता व्यक्तिगत भावनेपासून अलिप्त असल्यामुळे आणि साधारणीभूत राष्ट्रीय भावनांचीच त्यांच्या विशेषत्वाने अभिव्यक्ती झालेली असल्यामुळे मराठीतील राष्ट्रीय समूहगीताचे स्थान त्यांना प्राप्त झालेले आहे.

**३) स्वातंत्र्य कवी गोविंद -**

अपंग असूनही स्वातंत्र्य पांडुरंगाचा अहोरात्र ध्यास घेऊन लाव्हारसासारखी अंगार ओकणारी कविता लिहली. त्यांच्या कवितेला आत्मबळाचे अधिष्ठान आहे, प्रखर राष्ट्रभक्ती होती, पूर्व वैभवाचे स्मरण, पूर्व परंपरेचा अभिमान, वीर विभूतीपूजन वर्तमानकाळाचे यथार्थ प्रतिबिंब, आर्थिक विषमतेचे भान, कठोर आत्मपरिक्षण याचा अंतर्भाव त्यांच्या काव्यात आहे. यांच्या काव्यातूनच कुंजविहारीनी काव्यप्रेरणा घेतली. त्याकाळात सावरकरांचा अपवाद वगळता राष्ट्रस्वातंत्र्याचा ध्यास घेणारा आणि त्याकरिता आपली प्रतिभा, प्रज्ञा, वाणी लेखणी आणि सर्व शारीरिक सामर्थ्य वेचणारा दुसरा

कवी महाराष्ट्रात झाला नाही.

**४) स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर -**

सावरकरांनी अस्मितेची जागृती करून दिली. सशस्त्र क्रांतीची चळवळ उभी केली. बंडखोर नेता, महाकवी, समाजसुधारक राष्ट्रीय तत्त्वेत्ता व स्वतःचा ठसा उमटविणारे साहित्यिक वक्ते असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी खंडकाव्याची निर्मिती केली. उदा - गोमांतक, कमला, विरहोच्छवास, महासागर या कवितांना उत्कट स्वानुभूतीचे आणि अपार आत्म प्रत्ययाचे असाधारण तेज प्राप्त झाले आहे."[३४] जीवननिष्ठा राष्ट्रनिष्ठेशी एकरूप असून हौतात्म्याच्या तत्परतेमुळे उदात्तीकरण झालेले आहे. हेच त्यांचे वेगळेपण आहे.

**५) राष्ट्रकवी दु.आ.तिवारी -**

राष्ट्रीय आणि ऐतिहासिक कवितेचे विपूल लेखन करणारे एक राष्ट्रकवी म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक आहे. त्यांनी मराठ्याची संग्रामगीते, झाशीची संग्राम देवता, मनोहर लीला, महाराणा प्रतापसिंह, नंदिनी, कुमदवती व अनुवादीर्स गीते लिहली, राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यप्रेम, पूर्वपरंपरेचा गौरव व सद्यस्थितीची जागीव, अस्मितादर्शक भूमिका विभूती पूजन दिसते. लोकजागृती लोकशिक्षण राष्ट्रीय भावनांचे पोषण या हेतूने लेखन केले.

**६) राष्ट्रकवी माधव -**

यांच्या कविता तत्कालीन चळवळीचा काव्यमय प्रतिध्वनी आहेत. त्यांच्या ओढा शिवकालापेक्षा पेशवेकालाकडे अधिक असल्याचे आढळून येते. त्यांच्या काव्यात ऐतिहासिक प्रतिभा राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, राष्ट्रीय आशावाद आहे. ते कविता गात असत.

**७) राष्ट्रकवी केशव उपाध्ये -**

राष्ट्रप्रेम व्यक्त करणाऱ्या मोजक्या कवितेतून राष्ट्रभक्ती आणि स्वदेशाभिनाचा प्रत्यय येतो. टिळकभक्त उपाध्ये यांचा राष्ट्रीय वृत्तीचा कल वेदान्ती आहे.

**८) अभिजात राष्ट्रकवी बोबडे -**

त्यांच्या २५ राष्ट्रीय कविता आहेत. राष्ट्रकवितेची वैशिष्ट्ये त्यांच्या राष्ट्रीय काव्यात आहेत. श्रृंगार, वीर, हास्य, या रसांनी युक्त त्यांची कविता आहे.

**९) गायक राष्ट्रकवी आनंदराव टेकाडे -**

उत्स्फूर्त राष्ट्रीय गीते रचणारा आणि खणखणीत सुरात गाणाऱ्या या कवीला पहिल्या महायुध्दाच्या काळात उदयास आलेल्या कवीत अग्रपूजेचा मान आहे. भारत, महाराष्ट्र, शिवाजी, लोकमान्य ,यांना काव्यात स्थान दिले.

**१०) आधुनिक मराठी उपेक्षित राष्ट्रकवी ना.के.बेहरे -**

भारताच्या धामधुमीच्या राजकीय चळवळीचे प्रतिबिंब ज़िच्यात प्रकर्षाने पडलेले आहे. राष्ट्रवाद आणि मानवतावादी राष्ट्रवाद - गांधीवाद यांचेही दर्शन जीच्यातून घडलेले आहे आणि जागतिक विचारांची चाहूल स्पष्टपणे जीत व्यक्त झाली असी बेहऱ्यांची कविता आहे.

**११) टिळकांच्या स्वाभिमानी राष्ट्रवादाचे गायक 'राधारमण' -**

राष्ट्रीय काव्याची वैशिष्ट्ये यांच्याही काव्यामध्ये झालेली आहेत. एकंदर काव्याच्या निम्याहुन थोडा अधिक भाग टिळकांच्या स्वाभिमानी उद्‌गायनात खर्ची पडलेला आहे. म्हणून टिळकांच्या जीवनादर्शाचे काव्यक्षेत्रातील प्रतिनिधी मानले पाहिजे.

**१२) कवी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर -**

महाराष्ट्र गीत कोल्हटकरांनी लिहिले. की जे मराठीचे, महाराष्ट्राचे अमरस्त्रोत्र आहे.

यानंतर लोकमान्य टिळकांच्या गुणगौरव करणारे आणि त्यांच्यावर विलापिका लिहिणारे काही कवीही या कालखंडात आहेत.

अशाप्रकारे या कालखंडातील सर्वच कवींनी राष्ट्रीय काव्यनिर्मिती केली आहे. की ज्यामुळे लोकांच्यात कार्यप्रवणता निर्माण झालेली दिसते.

**४) राष्ट्रीय भावनेच्या विरताराचा कालखंड (इ.स.१९२२ ते इ.स.१९३५)**

टिळक युग संपले व गांधीयुग सुरू झाले सुरेश डोळक्यांच्या शब्दात - "व्यक्तिधर्म आणि सामर्थ्य आणि भौतिक प्रगती, धर्म आणि राजकारण, सामाजिक आणि राजकीय यात गांधीजींच्या दृष्टीने फरकच नव्हता. गांधीजींनी या सर्वांचे एकरूप रसायन कार्यान्वित केले की त्यामुळे व्यक्तीला आणि समाजाला स्वतःच सर्वांगीण व सर्वस्पर्शी उध्दाराचा एक नवाच युगधर्म गवसला."[३५] या पार्श्वभूमीमुळे गांधीजीच्या नेतृत्वाने प्रभावित झालेला कालखंड हे नाव दिले. तसेच लहान मोठ्या प्रक्षोभक राष्ट्रीय घटनांनी हा कालखंड व्यापलेला आहे. राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराच्या कालखंडातील काव्यविषयी -

१) राष्ट्रीयतेच्या चैतन्याची अमर गाथा गाणारे सेनापती बापटांना राजकीय चळवळीत १७ वर्षे तुरूंगवास भोगावा लागला. हरिभक्तीलाच राष्ट्रभक्तीत परिवर्तित केले. परंपरेचा अभिमान, वर्तमान प्रतिबिंबित दास्यमुक्तीसाठी हौतात्म्य स्वातंत्र्याचा ध्यास, आशीर्वाद, राष्ट्रप्रेम ही काव्याचे विषय आहेत. सेनापतींनी स्त्रियांनाही राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव दिली. साम्यवादी मार्क्सच्या विचारांच्या काव्यातून प्रचार केला.

२) साने गुरूजींच्या पिंड कलावंतापेक्षा तळमळीच्या देशभक्ताचा होता हे त्यांच्या जीवनावरून कळून येते. त्यांच्या राष्ट्रीय कवितेत ओजो गुणाचा लोप दिसतो. कारण प्रेमाचा समर्पणाचा त्यागाचा सेवेचा आणि वात्सल्याचा वर्षाव करणारे



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

मातृधर्मी व्यक्तिमत्त्व होते.

३) भ्रांत हिंदुपुत्रांना जागृत करून महाराष्ट्र, धर्म, शिकविणार राष्ट्रकवी माधव जुलियन त्यांनो सफल प्रेमाची गीते गायली राष्ट्रप्रेमाबरोबर महाराष्ट्रप्रेम दिस्ते.

४) कवी गिरीष - समाजनिष्ठ कवी आहेत हीच समाजनिष्ठा यांच्या राष्ट्रीयवृत्तीचा पुरावा आहे. स्वातंत्र्याची लालसा व पारतंत्र्याची तीव्र जाणीव व्यक्त केली आहे.

५) महाराष्ट्राचे शिवशाहीर यशवंताना म्हणते ते छत्रपती शिवराय या महाकाव्यामुळे त्या राष्ट्रीय जाणीव सतत अंतर्यामी जागृत होती. म्हणून आत्मपर राष्ट्रीय कविता लिहणारा कवी म्हणून संबोधतात.

६) राष्ट्रीय भावनेच्या स्फू र्तीलहरी जनजागृती करणारे कवी - काव्य विहारी कवी राष्ट्रवादी आहेत पण त्यांचा राष्ट्रवाद मानवतावादी आहे.

७) परंपराभिमानी, टिळकभक्त आणि राष्ट्रवादाचे प्रकटीकरण करण्यात अनंततनयांच्या प्रतिभेने उत्साह दाखविला आहे हे खरे आहे.

८) पारतंत्र्याच्या दुःखाने व्यथित होऊन नैराश्याची गाणी गाणारे गो.ल.आपटे आहेत.

९) आपट्यांप्रमाणे महाराष्ट्राच्या ऊर्जस्वल अस्मितेने प्रभावित होऊन राष्ट्रप्रेमाची उत्कट गीते गाणारे अज्ञातवासी (केळकर) आहेत. यामुळे काळ व प्रसंग जिवंतपणे उभे राहतात.

१०) अत्रे वा.भा.पाठकाविषयी म्हणतात, ‘वर्तमानासंबंधी समाधान भविष्यासंबधी आशा हे जसे पाठकांच्या काव्याचे उज्ज्वल गुण आहेत तसेच भूतकाळासंबंधी विशेषतः महाराष्ट्राच्या उज्ज्वल इतिहासाबद्दल जळजळीत अभिमान हेही त्यांच्या काव्याचे एक चित्ताकर्षक वैशिष्ट्ये आहे.

११) राष्ट्रीय भक्तीने भारलेल्या मनाने केलेली रसनिर्मिती असेच कुंजविहारींच्या

काव्याचे स्वरूप आहे. वैयक्तिक दुःखे दैन्य हृदयात कोंडून ठेवून स्वदेशाभिमानाची गाणी गायली म्हणूनच स्वातंत्र्य संग्रामात स्वतःला झोकून देणारे राष्ट्र शाहीर या शब्दांनीच त्याचा गौरव केला पाहिजे.

१२) अगदी बालवयापासून राष्ट्रभक्तीचे संस्कार असल्याने ग.ह.पाटील यांची राष्ट्रीय कविता प्राधान्याने बोधवादी नि चिंतनशील स्वरूपाची असून छंदात रचली आहे. तसेच त्यांना विकसनशील राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते म्हणतात.

१३) पतिव्रतेच्या शीलरक्षकाची व 'शशिमोहन' ही चरित्रकथा गाणारे अन्याय अत्याचाराच्या विरोधात लिहणारे या.मु.पाठक आहेत.

दासगणू, यशवंत कोरेकल, वि.बा.जोशी, दे.ल.महाजन, डॉ.ना.गो.नांदापूरकर, दुर्गादयाळ दिक्षित आदिंचा समावेश करता येईल.

**समारोप -**

ऐतिहासिक खंडकाव्ये व महाराष्ट्र गीते या कालखंडात लिहली आहेत. भारतमाता व महाराष्ट्राची गाणी यात येतात. अनेक कविंनी राष्ट्रीय कवितेचे दालन संपन्न व समृध्द केले आहे.

अनेक पोवाडे काव्यदृष्यातही श्रेष्ठ प्रतीचे रचिले गेले आहेत. पोवाड्याची निर्मिती प्राधान्याने राष्ट्रभक्ती प्रज्वलित करण्यासाठी झालेली असल्याने व ते लोकजागृती आणि लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन असल्याने त्यात प्रचाराचा भाग अधिक असणे स्वाभाविक आहे.

**५) संमिश्र वैचारिक प्रभावाचा कालखंड (इ.स.१९३५ ते १९५०)**

संमिश्र वैचारिक प्रभावाच्या या कालखंडात परंपरावादी राष्ट्रवादाची पिछेहाट झाल्याने अस्मितार्थ राष्ट्रवादी कवितेच्या ओहटीचा कालखंड असेही या कालखंडाचे वर्णन करता येईल. राष्ट्रीय कवी व कवितांचा अभ्यास करण्यापूर्वो राजकीय घटनांची

पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक ठरते.

१९३५ चा सुधारणा कायद्यामुळे स्वदेशीचा श्रीगणेशा व काँग्रेसच्या राष्ट्रीय योजनांना चालना. १९३९-चे दुसरे महायुध्द, १९४२ ची चलेजावची चळवळ, अखंड भारताचे विभाजन, १९४७ ला स्वातंत्र्य, १९४८ ला गांधी हत्या, १९४९ ला गणराज्याची निर्मिती. आदी ठळक घटना आहेत. मानवतावादी रष्ट्रवाद, समाजवाद, साम्यवाद आणि व्यक्तिवाद असा हा संमिश्र विचारांचा कालखंड आहे.

**१) कवी अनिल -**

महाराष्ट्र धर्माचे पुनरूज्जीवन आणि संताचा व्यापक मानवधर्म यांचा पुरस्कार करणारे राष्ट्रवादी कवी अनिल यांच्यावर राजवाड्यांचा प्रभाव आहे. इहवाद व संरक्षण तंत्राची अवहेलना हिंदू संस्कृतीला नडली. तसेच त्यांनी मानवतावादाचा पुरस्कार व परिस्थितीवादाचा स्वीकार केला.

**२) कुसुमाग्रज -**

क्रांतीच्या जयजयकाराची निर्भयतेने गर्जना करणारे ध्येयप्रवण राष्ट्रकवी कुसुमाग्रज यांच्या जीवनदृष्टीला भव्योदत्त जीवनाची ओढ होती. राष्ट्रभेद, स्वातंत्र्यप्रेम आणि पारतंत्र्याची तीव्र जाणीव होती. दुर्दम्य आशावाद, प्रयत्नवाद यांचा पुरस्कार केला.

**३) वा.ना.देशपांडे -**

विनम्र सेवाभावाने मातृभूमीची आराधना करणारे कवी आहेत. त्यांच्या राष्ट्रीय कविता मानवतावादी आहेत.

**४) ग.ल.ठोकळ -**

भूमातेच्या दुधाची महती गाणारे कवी आहेत. पारतंत्र्याची चीड, मराठी बाणा व आशावादी त्यांचे काव्य आहे.

**५) दामोदर अच्युत कारे -**

कारे गोमंतकीय बाण्याचे आहेत. प्रदेशाभिमान त्यांच्याकडे असून सामाजिक कळवळा त्यांच्याकडे आहे.

**६) बा.भ.बोरकर -**

गांधीवादी जीवननिष्ठेशी तादात्म्य साधून आलेल्या अनुभूतीतून प्रेरणा घेवून राष्ट्रीय कविता लिहल्या. म्हणून त्या श्रेष्ठ दर्जाच्या आहेत.

**७) मनमोहन -**

मनमोहन एक बंडखोर लोककवी आहेत त्यांच्या राष्ट्रीय कविता राष्ट्रीय काव्याच्या वैशिष्ट्यांनी युक्त आहेत. तसेच विभूतीपूजन त्यांच्या काव्याचा गाभा आहे. त्यांनी उद्धार युगायुगाचे वाटप्रवाशी, ही खंडकाव्ये तर पोवाडे, कविता लिहिल्या आहेत.

**८) म.श्री. पंडित -**

यांच्या राष्ट्रीय कविता राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय जीवनाचे यथातथ्य प्रतिबिंब चित्रित करणाऱ्या कविता आहेत.

**९) संत तुकडोजी महाराज -**

महाराजांची राष्ट्रीय कविता (भजने) म्हणजे पावन प्रयाग तीर्थ म्हणावे लागेल. ते द्रष्टे राष्ट्र कवी होते. ईश्वरसेवेकडून राष्ट्रसेवेकडे वळले.

**१०) वा.रा.कांत -**

निशिकांत ठकारांनी कुसूमाग्रज व क्रांतिसंप्रदायी या प्रवाहत कांताच्या कवितेचा समावेश केला आहे. भावनोत्कटता, कल्पकता आणि नाट्यात्मकता हे त्यांच्या राष्ट्रीय कवितेचे प्रमुख गुण आहेत. म्हणून त्यांना रूद्रविणेचा तीव्र झंकार करीत क्रांतीचे अंगारगीते गाणारे कांत म्हणतात.

**११)** पार्थिव, कृष्णकुमार आणि कांत यांनीही राष्ट्रीय कविता लिहिल्या.

**१२) निकुंभ -**

कमी अग्नी संप्रदायी न वाटता सौम्य असे चंद्रसंप्रदायी आहेत. राष्ट्रीय भावना, सुरम्य कल्पना, आणि अचूक शब्दरचना या विविध गुणांनी रसिकमान्य आहे. किंचित अग्नी फुलविण्याचे ठिणगीचे सामर्थ्य मोजक्या राष्ट्रीय कवितेत आहे.

**१३) काळेले -**

पारतंत्र्य, विषमता, दैन्य, दारिद्र्य, अज्ञान या राष्ट्रीय जीवनाला त्रासणाऱ्या आपत्तीतून मुक्त होण्यासाठी मानवतावादाचे अधिष्ठान असलेल्या समतावादी क्रांतीचा पुरस्कार काळेल्यांनी केला.

**१४) श्रीकृष्ण पोवळे -**

प्रा.निशिकांत ठकार म्हणतात - "त्यांच्या राष्ट्रीय कवितेते उल्केचे तेज वादळाचे सामर्थ्य, इंद्रधनुष्याचे सौंदर्य तिच्या ठिकाणी आहे. क्रांती चिरायू व्हावी म्हणून बैरवीला अवाहन करणआरे ध्येवादी कवी आहेत."[३६]

**१५) वि.दा.करंदीकर -**

स्वातंत्र्याचा उत्साहप्रेरक करंदीकर यांच्या काव्यात काव्यात्मकता असूनही आशयघनता आहे. आरंभीच्या राष्ट्रीय भावनेतून ती दिसते. म्हणूनच स्वातंत्र्याच्या संजीवनी मंत्रही त्यांनी दिला.

**१६) वसंत बापट -**

त्यांची कविता सर्वगुण संपन्न आहे. स्वानुभूत वासाचे दान असलेली असूनही मराठी बाण्याचे स्वातंत्र्य सैनिक नि राष्ट्रकवी गौरव करणे उचित ठरेल.

**१७) मंगेश पाडगावकर -**

अनेक ठिकाणच्या काव्यातील चिमणावरून साम्यवादाकडे झुकलेले राष्ट्रवादी कवी म्हणून पाडगावकर ओळखले जातात.

**१८) राजा बढे -**

महाराष्ट्रातील हिंदुत्ववादी विचारधारेच्या गांधीविषयक प्रतिक्रियांचे, बढे यांचे काव्य एक प्रातिनिधीक चित्र आहे. स्वा.सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाचे पुरस्कर्ते बढे आहेत.

**१९) गोविंदस्वामी आफळे -**

'राष्ट्रीय क्रिर्तन केसरी,' 'राष्ट्रीय किर्तन सम्राट' या कीर्तन क्षेत्रातील मानाच्या पदव्या संपादन करणारे आफळे यांनी कीर्तनातून हिंदूराष्ट्रवादचा प्रचार केला यांच्या प्रमाणेच हिंदूराष्ट्र वादाचा वादाचा पुरस्कार करणारे ध्येयवादी बळवंत वष्टे आणि नाना पालकर आहेत.

**२०) ग.दि.माडगूळकर -**

माडगूळकरांचे पोवाडे विविधपूर्ण, ओजस्वी, आणि प्रासादिक गुणांनी संपन्न आहेत. समरगीते, राष्ट्रीय काव्य १९५० नंतरचे आहे.

**२१) शाहीर अमर शेख -**

अमरशेखांनी कम्युनिस्ट पक्षाचे कवी, गायक लेखक यानात्याने कामगिरी बजावली. या कालखंडातील शाहिरी परंपरेचे ते प्रमुख प्रतिनिंधी आणि राष्ट्रीय लोककवी आहेत.

**२२) लोकशाहीर आण्णाभाऊ साठे -**

साठे साम्यवादी होते. साम्यवादी चांगले राष्ट्रवादी विचारसरणीचे होते. त्यांनी अनेक पोवाडे रचले, गायले.

२३) आणखी काही शाहीर आहेत की ज्यांना पोवाड्याची रचना करून लोकजागृती व रंजनातून लोकशिक्षण दिले. उदा. - मनोहर देशपांडे, कृष्णराव साबळे

**समारोप -**

मानवतावादी, समाजवादी, साम्यवादी व्यक्तिवादी इत्यादी जोवनादर्श मानवी कल्याणाचे कार्य जगात करीत असली तरी त्या सर्वांची व्यावहारिक आधारशिला राष्ट्रवाद आहे. तसेच सर्व राष्ट्राच्या व्यवस्थेचा एकमेव व भक्कम आधार राष्ट्रवाद आहे.

**११) मराठी राष्ट्रीय काव्याची वैशिष्ट्ये -**

राष्ट्रवादी कविची परंपरा पाहिली तर वरील गुणांबरोबर आणखी कित्येक निराळे नवीन गुण आपल्याला आढळून येतात. पारतंत्र्याची चीड हा महत्त्वाचा विशेष, अन्यायाचा प्रतिशोध घेण्यासाठी वापरावयाच्या साधनांची शुध्दाशुध्दता, पारतंत्र्य वेगवेगळया पध्दतीने ते दूर करण्याची धडपड, राष्ट्रीय असंतोष चेतविणे, यासाठी बाजारी प्रचारकी स्वरूप येवू न देणे, प्रासंगिक काव्य, राष्ट्रीय चळवळीला मदत करताना सरकारी रोषाला बळी न पडता व लोकांत वावर असल्याने वक्रोकर्ताकवी, रूपक ध्वनीचा वापर कमी. म्हणून शृंगार कटाक्षाने टाळला. त्यांना सामान्य अनुभवाची गाणी गाणे हेच आवश्यक वाटले. लोकगीतांसारखा आणि मेळयांच्या पदातून प्रचार केला. अशाप्रकारे काव्याचे मोल ठरविताना अनेक गोष्टीचा सूक्ष्मत्वाने व साकल्याने विचार करावा लागेल.

यावरून असे लक्षात येते की, भारतीय राष्ट्रीय कविता या स्वयंप्रेरित आहेत. मराठी राष्ट्रीय कविता व राष्ट्रीय कविता पाहता मराठी कवितेत साम्य आधिक्य असल्याचे दिसून येते.

**१२) कवी कुंजविहारी यांचे वेगळेपण व महत्त्व -**

राष्ट्रीय कवितेचे स्वरूप, व्याप्ती, विकास, आपण पाहिला. या राष्ट्रीय कवी व कवितांमध्ये कुंजविहारीचे स्थान काय ? हा प्रश्न उरतोय तेव्हा त्याविषयीचे विवेचन पुढीलप्रमाणे -

राष्ट्रीय भावनेच्या विस्ताराचा कालखंड इ.स.१९२२ ते इ.स.१९३५ या चौथ्या कालखंडात कवी कुंजविहारी यांच्या राष्ट्रीय कवितेचा कार्यकाल आहे. या काळखंडातच त्यांच्या काव्याचा उत्कट राष्ट्रीयत्वाचा बहर आहे. कुंजविहारी हे सिमाकाळातील कवी आहेत. कुंजविहारींनी टिळक युग, गांधीयुग पाहिले आत्मसात करून काव्यात आणले यामुळेच ते राष्ट्रभक्ती कडून आत्मशक्तीकडे, अध्यात्माकडे, समाजवाद, मानवतावादाकडे वळले. तसेच आणखीन एक मुद्दा तो म्हणजे स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळात दोन्हीतही लिखाण केले. या दोन्ही कालखंडात त्यांच्याकडे उत्कट आशावाद होता.

राष्ट्रीय कवितेमधील काही कवी, कविता व कुंजविहारी यांच्यात साम्य आहे. उदा. १) राष्ट्रकवी गोविंदाकडून कुंजविहारींनी काव्यप्रेरणा घेतली गोविंदाच्या कवितेप्रमाणेच कुंजविहारींच्या कविता आत्मनिष्ठ आहेत. २) कवी बी च्या प्रमाणे कौटुंबिक साम्य कुंजविहारींप्रमाणे आहे. ३) स्वातंत्र्यवीर सावरकरांकडून कवींनी शाहिरी काव्याची प्रेरणा घेतली 'नरवीर तानाजी' वरील काव्य सावरकरांच्या ''सिंहगडाच्या'' पोवाड्यासारखे आहे. तसेच शाहिरी कवीशी साम्य आहे. ४) राष्ट्रकवी विनायकाप्रमाणे शेवटपर्यंत राष्ट्रनिष्ठ व काव्यनिष्ठ राहिले एवढेच नव्हे तर राष्ट्रीय जीवनाशी एकरूप झाल्याने आध्यात्मिक स्वरूपाची बनते. तसेच ५) राष्ट्रकवी तिवारीप्रमाणे खड्या आवाजात कविता गाऊन दाखवत व जनसामन्यावर योग्य तो परिणाम साधत.

कुंजविहारींच्या राष्ट्रीय काव्यात असणारी अलौकिकता पुढील काही उदाहणावरून दिसून येते. १) राष्ट्रीय काव्यात प्रत्यक्ष भाग घेवून त्या अनुभूतीने कविता लिहणाऱ्या बोटावर मोजण्यासारख्या कवीत कुंजविहारीचे स्थाने आहे. २) तसेच कोणताही दुसरा काव्यप्रकार हाताळला गेला नाही. फक्त राष्ट्रीय भूमिकेतून लिखाण केले काव्य लिहले. कारण राष्ट्रप्रेम हा कुंजविहारींचा स्थायीभाव आहे. ३) अनेक भाषेतून राष्ट्रीय कविता

लिहिल्या उदा - उर्दू, हिंदी, मराठी, ४) काही राष्ट्रीय कविता प्रासंगिक आहेत परंतु त्यातील मूळ प्रवृत्ती पाहता त्या आजही त्या प्रेरक ठरतात. ५) त्यांनी आपल्या कवितेचे भांडवल केले नाही. (निवडणुकीसारखी संधी चालून येवून सुध्दा)

म्हणून सारांशरूपाने कुंजविहारींच्या स्थानाविषयी खालीलप्रमाणे म्हणता येईल. केशवसुतांपासून कुसुमाग्रजापर्यंत ललित कवी परंपरेत आणि विनायक, गोविंद, तिवारीपासून अज्ञातवासी, साने या राष्ट्रवादी कविमालिकेत कुंजविहारींचे स्थान पृथक व प्रभावयुक्त आहे. यांच्या काव्यात स्वगौरवाचा टेंभा नाही. यांच्या काव्यात शब्दांचा पालापाचोळा उडवत सामान्य लोकांच्या डोक्यावरून वाऱ्यावर वहात जाणारे शब्दमय उच्च विचार नाहीत. प्रगूढतेची लाल धुकी निर्माण केलेली नाहीत. क्रांतीच्या नाटकी गर्जना अन जयजयकार नाहीत. प्रणयपताका धाऱ्यांचे आणि दुर्बलांचे क्षुद्र शृंगार नाहीत. तत्कालीन प्रसंगाचा किंवा व्यक्तींचा अकारण व अवास्तव गौरव करण्याची प्रवृत्ती नाही व सवंग लोकप्रियतेची धडपड नाही.

आणि म्हणून कुणाशी तुलना न करता कुंजविहारींचे स्थान स्वयंमेव सिध्द व 'कनिष्ठि-काधिठाष्टित' आहे. असे म्हटले तर त्यांत कुणाला गौण वाटणार नाही.

## संदर्भसूची


१) थिओडर हर्षल, हॅन्स कोहन, नॅशनालिझम इटस मिनिंग ॲन्ड हिस्ट्री, डी व्हान नॉस्डर्ड कंपनी, कॅनडा, १९६५, द्वि.पृ.८२, ८४

२) लुईस एक स्नॉयडर, दि मिनिंग ऑफ नॅशनालिझम तळटीप, पृ.८, ९

३) अर्नेस्ट बार्कर, लुईस एल स्नॉयडर दि मिनिंग ऑफ नॅशनालिझ, ट्रस्टीज ऑफ रूटगर्स कॉलेज, न्यजर्सी, अमेरिका, १९५४ पृ. ३२.

४) फ्रांसिस लॉयबर, लुईस एल स्नॉयडर, तत्रैव, पृ. ३३

५) बिपीनचंद पाल, व्ही.पी.वर्मा, इंडीयन नॅशनालिस्ट मुव्हमेंट ॲन्ड थॉट, लक्ष्मीनारायण अगरवाल, आग्रा १९५९, दि. पृष्ठ - २५४

६) वि.दा.सावरकर, हिंदू राष्ट्र दर्शन सौ.मं.अ. गाडगीळ, पुणे १९७४ प्र.पृ.७३,७४

७) हॅन्स कोहन, नॅशनालिझम इटस मिनिंग ॲन्ड हिस्ट्री, पृ.१३

८) थिओडर हर्षल, हॅन्स कोहन, तत्रैव पृ.९

९) थिओडर हर्षल, हॅन्स कोहन, तत्रैव पृ.११

१०) ग.त्र्य. माडखोळकर, आधुनिक कवी पंचक ग.त्र्य.माडखोळकर, भट आणि मंडळी, पुणे १९२१ प्र.पृ.८७, ८८

११) कृ.ब.निकुंब, मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५, भाग १, सं.पा.रा.श्री.जोग, भिमराव कुलकर्णी, १९७३, पृ.३०५, ३०७

१२) ग.त्र्यं. माडखोलकर, तत्रैव पृ.८७, ८८

१३) प्र.ल.गावडे, विनायक दामोदर सावरकर - एक चिकित्सक अभ्यास प्र.का.वि.प. महाजन, स्वा.मं.प्रकाशन पुणे १९७० प्र.पृ. ३९२

१४) धनंजयराव गाडगीळ, महाराष्ट्र जीवन, परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड - पहिला संपादक - गं.बा.सरदार जोशी आणि लोखंडे, पुणे १९६० प्र.पृ.१९-२०

१५) व्ही.पी.वर्मा, इंडीयन, नॅश्नालिस्ट मुव्हमेंट ॲन्ड थॉट, लक्ष्मीनारायण अगरवाल, आग्रा, १९५९ पृ.१५

१६) व्ही.पी.वर्मा, तत्रैव पृ.१५

१७) अ.ना.देशपांडे, खंड आधुनिक मराठी वाङ्.मयाचा इतिहास भाग पहिला, व्हीनस प्रकाशन, पुणे १९९२, पृ.१, १०३.

१८) लुईस एल स्नॉयडर, व्हरायटीज ऑफ नॅशनॅलिझम, पृ.५१

१९) ग.त्र्यं.देशपांडे, राष्ट्रीय उत्थानात साहित्याचे स्थान, स्मारक व्याख्यानमाला, नागपूर प्रकाशान विभाग, माहिती आणि नभोवाणी भारत सरकार, १९६४

२०) ग.त्र्यं. देशपांडे तत्रैव, पृ.५५

२१) मा.का.देशपांडे, स्वामी विवेकानंदाज राऊझिंग कॉल टू हिंदू नेशन पृ.३७

२२) म.ना.अदवंत, मराठ्यांची संग्राम गीते, प्रस्तावना पृ.३

२३) म.ना.अदवंत, तत्रैव, पृ.३-४

२४) म.ना.अदवंत, तत्रैव, पृ.२-३

२५) म.ना.अदवंत, तत्रैव, पृ.२-३

२६) नाईकवाडे ज.धु. राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता १९८४, डॉ.अ.ना.देशपांडे प्रकाशित नागपूर साहित्य प्रसार केंद्र, १९८९, पृ.८१-८२

२७) नाईकवाडे ज.धु.तत्रैव पृ.५३७

२८) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महात्माफुले, समग्र वाड़मय प्रस्तावना, १९६९ पृ.५

२९) दि.का.गर्दे, आ.भा.राज्यविचार, पृ.१३५

३०) नाईकवाडे ज.धु.तत्रैव पृ.१९४

३१) भ.श्री.पंडित, म्राठी वाङ्.मयाचा इतिहास, खंड - ४, पृ.३२३

३२) नाईकवाडे ज.धु. तत्रैव, पृ.२०८

३३) अ.ना.देशपांडे, आ.स.वा.इति.भाग १, पृ.३९६

३४) धनंजय कीर, सावरकर एक चिकित्सक अभ्यास प्र.ल.गावडे पृ.३४३

३५) सु.म.डोळके, तरूण भारत, नागपूर लेख, महात्मागांधी, गौरव ग्रंथ परीक्षण, उत्तरार्ध, दि.१९/४/१९९७

३६) नि.शं.ठकार, म.क.ख आणि विवेच, पृ.३३० - ३३१